| MHNB100013022022 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | १४/१०/२०२२ |
| | नोंदणी दिनांक | :- | १४/१०/२०२२ |
| | निकला दिनांक | :- | २६/१२/२०२३ |
| | कालावधी | :- | ०१ वर्ष. ०२ महिने. १२ दिवस. |

# प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार यांचे न्यायालयात

**( पीठासीन अधिकारी – श्री विश्वास पां. शिंदे )**

**सं.फौ.ख.क्र. ६४४/२०२२**
**निशाणी क्र. ४४/ब**
**गु.र.नं. २१६/२०२२**
**अक्कलकुवा पोलिस ठाणे.**

| | | |
|---|---|---|
| **सरकारपक्ष** | ]<br>]<br>] | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलिस ठाणे अंमलदार, पोलिस ठाणे,<br>अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार. |
| **प्रतिनिधीत्व** | ] | श्री.एम.आय.मन्सुरी, सहाय्यक सरकारी वकील |
| | | **–विरुद्ध–** |
| **आरोपी** | ]<br>]<br>] | **नितेश लक्ष्मण वळवी,**<br>वय :– ३० वर्षे, व्यवसाय :– वाहनचालक,<br>रा.राजपुर, ता.कुकरमुंडा, जि.तापी. |
| **प्रतिनिधीत्व** | ] | श्री. उमेश एम.पाडवी |

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २०/०३/२०२३ |
| २) | प्रथम वर्दी अहवाल नोंदविल्याचा दिनांक | :– | २२/०५/२०२२ |
| ३) | दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | :– | १४/१०/२०२२ |

संं.फौ.खटला क्र. ६४४/२०२२
निशाणी क्रमांक –४४/ब
सरकार वि. निलेश लक्ष्मण वळवी

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | दोषारोपपत्र निश्चित केल्याचा दिनांक | :– | १७/०३/२०२३ |
| ५) | पुरावा सुरू केल्याचा दिनांक | :– | ०४/१२/२०२३ |
| ६) | निकालासाठी राखीव ठेवल्याचा दिनांक | :– | २६/१२/२०२३ |
| ७) | निकाल घोषीत केल्याचा दिनांक | :– | २६/१२/२०२३ |
| ८) | शिक्षा सुनावली असल्यास आदेश दिनांक | :– | निरंक |

**<u>आरोपीची माहिती</u>**

| **आरोपी क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक दिनांक** | **जामिनावर मुक्त दिनांक** | **ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची कलमे** | **निर्दोष किंवा शिक्षा** | **शिक्षेचे वर्णन** | **फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता कारागृह कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | नितेश लक्ष्मण वळवी | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–अ नुसार नोटीस | १४/१०/२०२२ | भा.द.वि. कलम ३०४–अ, २७९, ३३७, ३३८, ४२७ आणि मोटार वाहन कायदा कलम १८४, ६६/१९२, ३(१)/१८१ | निर्दोष | निरंक | निरंक |

**सरकार पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालय तर्फे साक्षीदारांची यादी**

**अ) सरकार पक्ष :–**

| **साक्षीदार क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदाराची वर्गवारी** | **निशाणी क्रमांक.** |
|---|---|---|---|
| १) | विनेश शंकर वसावा | प्रत्यक्षदर्शी तथा जखमी साक्षीदार | २२/क |
| २) | जेरमाबाई वसंत वळवी | साक्षीदार | २३/क |
| ३) | आशाबाई रविंद्र वळवी | साक्षीदार | २४/क |

**ब)** **बचाव पक्षाच्या साक्षीदारांची यादी** :- निरंक

**क)** **न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी** :- निरंक

**सरकार पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालय तर्फे दस्तऐवजांना निशाणी देण्यात आलेली यादी**

**अ)** **सरकार पक्ष** :– निरंक

**ब)** **बचाव पक्ष** :–

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **दस्तऐवजांचे विवरण** | **दस्तऐवजास निशाणी देण्यात आलेले** |
|---|---|---|---|
| १) | २५ | घटनास्थळ पंचनामा | मान्य केलेले दस्त |
| २) | २६ | मरणोत्तर पंचनामा | मान्य केलेले दस्त |
| ३) | २७ | शवविच्छेदन अहवाल | मान्य केलेले दस्त |
| ४) | २८ ते ४३ | वैद्यकीय प्रमाणपत्रे | मान्य केलेले दस्त |

**क)** **न्यायालयातर्फे निशाणी** :– निरंक

**ड)** **मुद्देमाल / वस्तु** :– निरंक

## न्या य नि र्ण य व आ दे श

**( दिनांक २६ डिसेंबर, २०२३ रोजी पारीत )**

आरोपी भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, ४२७

आणि मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४, ६६/१९२, ३(१)/१८१ अन्वये शिक्षेत्र पात्र गुन्हयांच्या संपरिक्षणास सामोरे जात आहे.

०२) अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

फिर्यादी पोलिस हे.कॉ. मोहन रतन शिरसाठ हे पोलिस ठाणे अक्कलकुवा अंतर्गत खापर दुरक्षेत्र येथे कार्यरत होते. त्यादिवशी विनेश वंकर वसावा यांनी खबर दिली की, दिनांक १९/०३/२०२२ रोजी सकाळी ९.०० वाजेच्या सुमारास ते, त्यांची पत्नी, मुलगी व नातेवाईक असे कुकरमुंडा येथुन देवमोगरा येथे एम.एच.४१/सी–८९५० या क्रमांकाच्या ॲपेरिक्षाने गेले होते व पुन्हा दिनांक २०/०३/२०२२ रोजी परत येतांना सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास खापर जवळील उदयपुर गावाजवळ रोडवर त्यांची ॲपेरिक्षा अचानक पलटी झाली. सदरच्या अपघातामध्ये खबरी विनेश याच्या उजव्या पायास व इतर प्रवाशांना किरकोळ दुखापत व त्यांची पत्नी सकीलाबाई हिच्या डोक्यास, छातीस व पायास गंभीर दुखापत झाली होती. त्यावेळी रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्यांनी त्यांना खापर येथील सरकारी रुग्णालयात उपचारासाठी आणले व पत्नीस अधिक उपचारासाठी नंदुरबार येथील सरकारी रुग्णालयात नेण्यात आले. तेथे तपासणीनंतर डॉक्टारांनी त्यांची पत्नी सकीलाबाई ही मयत झाल्याचे सांगितले. सदरचा अपघात हा आरोपीने परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन निष्काळजीपणे वाहन चालवल्याने पोलिस ठाणे, अक्कलकुवा येथे भा.द.वि. कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, ४२७ आणि मोटार वाहन कायदा कलम १८४, ६६/१९२, ३(१)/१८१ अन्वये आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली. त्याआधारे अपराध क्र. २१६/२०२२ नोंदविण्यात आला.

०३) सदरच्या गुन्ह्याचा तपास हा सहाय्यक पोलिस हे.कॉ. मोहन रतन शिरसाठ यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा केला, मयताचा शवविच्छेदन अहवाल प्राप्त केला, मरणोत्तर पंचनामा प्राप्त केला, जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्रे प्राप्त केली, तपासादरम्यान वाहनाचे कागदपत्रे हस्तगत केले, आणि तपासाअंती आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळून आढळून आल्यामुळे प्रस्तुतचे दोषारोपपत्र दाखल केले.

**०४)** मी आरोपीविरुद्ध निशाणी क्र. १३ द्वारे दोषारोप निर्धारित केले असता त्याने लावण्यात आलेले आरोप अमान्य करुन खटल्याच्या संपरिक्षणास सामोरे जाण्याची इच्छा व्यक्त केली. आरोपीतर्फे घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.२५), मरणोत्तर पंचनामा (नि.क्र.२६), शवविच्छेन अहवाल (नि.क्र.२७), वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.क्र.२८ ते ४३) इत्यादी कागदपत्रे कबुल करण्यात आलेली आहेत. महत्त्वाचे साक्षीपुरावे नोंदविल्यानंतर अभियोगपक्षातर्फे पुरावा बंद करण्यात आला. खटल्याच्या सुनावणीअंती आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्याची आवश्यकता भासली नाही.

**०५)** अभियोगपक्षाचे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री एम. आय. मन्सुरी आणि बचाव पक्षाचे विधिज्ञ श्री उमेश एम.पाडवी यांचा युक्तिवाद ऐकला. अभियोग पक्षाची हकीकत, पटलावरील पुरावा आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकता प्रस्तुतचा खटला निकाली काढण्याकरिता माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित होतात आणि त्यांवरील माझे निष्कर्ष आणि त्याकरिताची आवश्यक कारणे मी तद्नंतर विस्तृत करीत आहे.

| मुद्दे | | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १– | दिनांक २०/०३/२०२२ रोजी सकाळी १०:०० वाजेच्या दरम्यान अंकलेश्वर– बऱ्हाणपुर महामार्गावरील मौजे उदयपुर गावाच्या पश्चिमेस सार्वजनिक जागी आरोपीने त्याच्या ताब्यातील एम.एच.४१/सी.–८९५० क्रमांकाची ॲपेरिक्षा हे वाहन हलगर्जीपणे किंवा निष्काळजीपणे चालविली, आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम **२७९** अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | :– | नकारार्थी |

| | | | |
|---|---|---|---|
| २– | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने सदर वाहन निष्काळजीपणे चालवून ॲपेरिक्षावरील नियंत्रण सुटले, ज्यामुळे सदर वाहन पलटी होऊन सकीलाबाई वसावा यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला, आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम **३०४(अ)** अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | :– | नकारार्थी |
| ३– | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने सदर वाहन निष्काळजीपणे चालवून ॲपेरिक्षावरील नियंत्रण सुटले, ज्यामुळे सदर वाहन पलटी होऊन सकीलाबाई व वाहनात बसलेल्या इतर प्रवाशी यांच्या दुखापतीस कारणीभूत ठरला, आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम **३३७** अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | :– | नकारार्थी |
| ४– | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने सदर वाहन निष्काळजीपणे, बेदरकारपणे चालवून ॲपेरिक्षावरील नियंत्रण सुटले, ज्यामुळे सदर वाहन पलटी होऊन सकीलाबाई वसावा व वाहनात बसलेल्या इतर प्रवाशी यांच्या गंभीर दुखापतीस कारणीभूत ठरला, आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम **३३८** अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | :– | नकारार्थी |
| ५– | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने सदर वाहन निष्काळजीपणे चालवून सदरहु वाहनाचे रुपये ५०/– पेक्षा जास्तीचे नुकसानीस कारणाभूत ठरला, आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम **४२७** अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | :– | नकारार्थी |

| | | | |
|---|---|---|---|
| ६– | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने सदर वाहन धोकादायकरित्या चालविले, आणि त्याद्वारे मोटार वाहन कायद्याच्या कलम **१८४** अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | :– | नकारार्थी |
| ७– | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने सदर वाहनात विनापरवाना क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी बसवून अवैध प्रवाशी वाहतुक केली, आणि त्याद्वारे मोटार वाहन कायद्याच्या कलम **६६** सह कलम **१९२** अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | :– | नकारार्थी |
| ८– | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्याकडे वाहन चालविण्याचा अधिकृत परवाना असणे बंधनकारक असतांना देखील सुध्दा सार्वजनिक ठिकाणी सदरचे वाहन विना परवाना चालविले, आणि त्याअन्वये तुम्ही मोटार वाहन कायद्याच्या कलम **३(१)** मधील तरतूदींचा भंग करीत कलम **१८१** प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा अपराध केला आहे. | :– | नकारार्थी |
| ९– | काय आदेश ? | :– | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ ते ८ बाबत</u> :–**

**०६)** घटनेच्यावेळी अपघातामधील वाहन हे आरोपी चालवित होता तसेच सदरचे वाहन हे आरोपी चालवित असतांना त्याने ते हयगयीने व निष्काळजपणे चालवुन सदरचे वाहन पलटी केले होते ही बाब अभियोगपक्षाने संशयापलिकडे जाऊन सिध्द केली आहे किंवा कसे हे पाहणे महत्वाचे आहे. त्याअनुषंगाने अभियोगपक्षाकडुन आरोपीविरुध्द गुन्हा शाबीतीसाठी एकुण तीन साक्षीदार

तपासण्यात आलेले आहे. अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे विनेश शंकर वसावा (अ.सा.क्र.१), जेरमाबाई वसंत वळवी (अ.सा.क्र.२) आणि आशाबाई रविंद्र वळवी (अ.सा.क्र.३) हे प्रस्तुत घटनेचे प्रत्यक्षदर्शी तथा जखमी साक्षीदार आहेत.

०७) अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे प्रत्यक्षदर्शी तथा जखमी साक्षीदार विनेश शंकर वसावा (अ.सा.क्र.१) हा घटनेच्यावेळी अपघातामधील आरोपी चालवित असलेल्या वाहनामधुन त्यांची पत्नी सकीलाबाई व इतर नातेवाईक यांच्या सोबत जात असताना सदरचा अपघात झालेला आहे. सदरच्या अपघातात त्यांना व त्यांच्या पत्नीच्या पायाला दुखापत झाल्याचे सांगत आहे. सदरचे वाहन हे आरोपी नितेश हा चालवित होता असे सांगत आहे. मात्र सदरचा साक्षीदार हा असे सांगतो की, सदरचा अपघात हा कसा झाला व कोणाच्या चुकीमुळे झाला याबाबत त्यांना सुध्दा काहीही माहिती नाही असे सांगत आहे.

०८) तसेच साक्षीदार जेरमाबाई (अ.सा.क्र.२) व आशाबाई (अ.सा.क्र.३) या अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे अपघातामधील जखमी आहेत. मात्र त्या त्यांच्या सरतपासामध्ये अपघात झाल्याची बाब तसेच सदरच्या अपतघातामध्ये त्यांना दुखापत झाल्याचे स्पष्टपणे नाकारत आहेत. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी परवानगी घेऊन सदरहु साक्षीदाराला विचारलेले उत्तर सुचक प्रश्नांमध्ये देखील आरोपीच्या विरुध्द अभियोगपक्षाच्या लाभात काहीही निष्पन्न झालेले नाही. तसेच प्रत्यक्षदर्शी तथा जखमी साक्षीदार व आरोपी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे अभिलेखावर सादर करण्यात आल्यामुळे अन्य साक्षीदार तपासण्यामध्ये अभियोगपक्षाने स्वारस्य दाखविले नाही.

०९) एकंदरीत घटनेच्यावेळी अपतघातामधील वाहन हे आरोपी चालवित होता ही बाब फिर्यादी विनेश (अ.सा.क्र.१) याच्या साक्षीपुराव्यातुन सिध्द होत आहे. मात्र पटलावर आलेल्या पुराव्यामधुन सदरच्या अपघातामध्ये शकीलाबाई वसावा यांना गंभीर दुखापत होऊन मृत्यू झाल्याचे तसेच अन्य गाडीमधील प्रवाश्यांना साध्या व गंभीर स्वरुपाच्या दुखापती झाल्याचे दिसुन

येत आहे. मात्र पटलावर आलेल्या पुराव्यावरुन घटनेच्यावेळी आरोपीच्या निष्काळजीपणामुळे अथवा धोकादायकरित्यावाहन चालविण्यामुळे सदर अपघात झाला नसल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे शकीलाबाई हिच्या मृत्यूस तसेच इतर प्रवाश्यांना झालेल्या दुखापतीबाबत आरोपीस जबाबदार धरता येणार नसल्याचे माझे मत बनते. तसेच अभियोगपक्षाच्या पुराव्यातुन घटनेच्यावेळी अपघातामधील वाहनामध्ये नक्की किती प्रवासी होते याबाबत देखील कोणताही पुरावा पटलावर आणण्यात आलेला नाही. एकंदरीत विषयांकित गुन्हे आरोपी विरुध्द रास्त शंकेपलिकडे जाऊन सिध्द झालेले नाहीत. सबब वर नमूद कारणांकरिता मी मुद्दा क्र.१ ते ८ चे उत्तर नकारार्थी असे नमूद करतो आणि मुद्दा क्र.९ चे उत्तरार्थ पुढील आदेश पारीत करतो.

## आ दे श

१} आरोपी **निलेश लक्ष्मण वळवी** याची भारतीय दंड संहितेच्या कलम २७९, ३०४(अ), ३३७, ३३८, ४२७ आणि मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४, ६६/१९२, ३(१)/१८१ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यामधून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२} आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३} आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) अन्वये रुपये १५,०००/– (पंधरा हजार रुपये) ची जमानत व तेवढ्याच किंमतीचे वैयक्तीक बंधपत्र द्यावे. सदरचे जमानत व बंधपत्र हे सहा महिन्यापर्यंत अंमलात राहिल.

(निकालपत्र खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आले.)

*स्वाक्षरीत/––*
( विश्वांस पां. शिंदे )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अक्कलकुवा
जिल्हा नंदूरबार.

ठिकाण :– अक्कलकुवा
दिनांक :– २६/१२/२०२३

संं.फौ.खटला क्र. ६४४/२०२२
निशाणी क्रमांक –४४/ब
सरकार वि. निलेश लक्ष्मण वळवी

## दा ख ला

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | मयुर धर्मराज पाटील |
| न्यायालयाचे नाव | :– | दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार. |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | :– | २६/१२/२०२३ |
| न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | २६/१२/२०२३ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | २८/१२/२०२३ |